वर्ष : ०४ | अंक: ४९ | मुंबई, मंगळवार ३० ऑक्टोबर २०१८ ते ५ नोव्हेंबर २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG|2 पंतप्रधान आवास योजनेची कासवगतीने वाटचाल

3 → जायकवाडीचा तिढा

आधार ई-केवायसी वापर बंद करा ← 4






## मराठा आरक्षण १५ नोव्हेंबरपर्यंत जाहीर करा





# अन्यथा मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरु देणार नाही

**मुंबई - राज्य शासनाने मराठा समाजाला १५ नोव्हेंबरपर्यंत आरक्षण जाहीर करावे, अन्यथा गनिमी काव्याने यापुढे आंदोलन केले जाईल, असा इशारा मराठा मार्च्याच्यावतीने देण्यात आला आहे. मुंबईत यशवंतराव चव्हाण केंद्र येथे शनिवारी राज्यातील सर्व मराठा मार्चाच्या समन्वयकांची बैठक पार पडली. यावेळी हा निर्णय घेण्यात आला.**

### ... तर २१ तारखेपासून राज्यभर तीव्र आंदोलन, मराठा आंदोलकांचा सरकारला 'इशारा'

मराठा क्रांती ठोक मोर्चाने शनिवारी दुपारी यशवंतराव चव्हाण केंद्र याठिकाणी घेतलेल्या राज्यव्यापी बैठकीत २० नोव्हेंबरपासून आझाद मैदानात बेमुदत उपोषणास बसण्याचा निर्णय जाहीर केला आहे. २० नोव्हेंबरपर्यंत राज्य सरकारने मराठा समाजासाठी आरक्षणाची घोषणा केली नाही, तर २१ तारखेपासून राज्यभर तीव्र आंदोलनाला सुरुवात होईल, अशी माहिती मोर्चाचे समन्वयक नानासाहेब जावळे पाटील यांनी दिली.






राज्य शासनाने यापूर्वी सांगितल्याप्रमाणे १५ नोव्हेंबरपर्यंत आरक्षण जाहीर करावे, असे समन्वयकांच्या बैठकीत ठरले. जर या दिवसांपर्यंत आरक्षण जाहीर झाले नाही तर मराठा मोर्चाकडून २० नोव्हेंबरपासून तुळजापूर आणि मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषण करण्यात येईल. त्यानंतरही शासनाने आमच्या शांततेच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलनाची दिशा बदलून मिळेल त्या वाटेने आंदोलन करण्यात येईल. यामध्ये मोर्चे, उपोषण, गनिमी कावा किंवा हिंसक आंदोलनांचाही समावेश असेल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच आरक्षण जाहीर झाले नाही तर मुख्यमंत्रीच नव्हे तर एकही मंत्र्याला महाराष्ट्रात फिरु देणार नाही, असा आक्रमक पवित्राही यावेळी मराठा मोर्चा समन्वयकांनी घेतला. त्याचबरोबर आंदोलनादरम्यान आंदोलकांवर जे गंभीर गुन्हे दाखल झाले आहेत ते त्वरीत मागे घेण्यात यावे. मुख्यमंत्र्यांनी तसा शब्द दिला आहे याचे पालन त्यांनी करावे अन्यथा आम्ही सरकारची मस्ती उतरवल्याशिवाय राहणार नाही, अशी शपथच आता घेतली आहे, असे यावेळी समन्वयकांकडून सांगण्यात आले.

## दाऊदच्या भावाची बडदास्त

# ५ पोलीस निलंबित

**अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा भाऊ इक्बाल कासकरला 'स्पेशल ट्रीटमेंट' देणाऱ्या ठाण्यातील पाच पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ठाण्याचे सह पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी ही कारवाई केली.**

इक्बाल कासकरला खंडणीच्या तीन वेगवेगळ्या प्रकरणांत अटक करण्यात आलेली आहे. त्याच्यावर 'मकोका'खाली कारवाई करण्यात आली असून ठाणे मध्यवर्ती कारागृहात त्याची रवानगी करण्यात आली आहे. दरम्यान, मधुमेह तसेच दातांवरील उपचारांसाठी त्याला गुरुवारी ठाणे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले होते. तिथे कशाप्रकारे त्याची बडदास्त ठेवण्यात आली, याचं 'स्टिंग ऑपरेशन' एका खासगी वृत्तवाहिनीने केलं असून याची गंभीर दखल घेत संबंधित पोलिसांवर कारवाई करण्यात आली आहे. निलंबित करण्यात आलेल्या



पोलिसांमध्ये एक उपनिरीक्षक व चार कॉन्स्टेबल आहेत.

### बिर्याणीवर ताव आणि पैसेवाटप!

उपचारांच्या नावाखाली रुग्णालयात गेलेला इक्बाल कासकर पोलिसांदेखत बिर्याणीवर ताव मारताना तसेच सिगारेटचे झुरके घेताना व्हिडिओत दिसत आहे. सुमारे १० तास इक्बाल रुग्णालयात होता. यादरम्यान त्याला अनेक नातेवाईक भेटायला आले. इक्बालची तिथे ज्यांनी ज्यांनी बडदास्त ठेवली त्या सर्वांना त्याने पैसे वाटल्याचेही या 'स्टिंग'मध्ये उघड झालं आहे.

# शिवसेनेशी युती होईलच!

**राजकीय वास्तवाची जाण ठेवूनच नेहमी राजकारण केले जाते. सध्याच्या परिस्थितीत दोन्ही काँग्रेस एकत्र लढत असताना शिवसेना आणि भाजप वेगळे लढले, तर त्यात दोघांचे नुकसान आणि विरोधकांचा लाभ होईल, ही वस्तुस्थिती सर्वानाच कळते. त्यामुळे जे हिंदुत्ववादी म्हणायलाही घाबरतात, त्यांना उद्धव ठाकरे कधीच पाठिंबा देणार नाहीत, असे सांगत लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शिवसेनेशी भाजपची युती होईलच, असा ठाम विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.**

फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप-शिवसेना युतीचे सरकार या ३१ ऑक्टोबरला चार वर्षांचा कार्यकाल पूर्ण करीत आहे. या पार्श्वभूमीवर दिलेल्या खास मुलाखतीत मुख्यमंत्र्यांनी ही भूमिका मांडली.



ते म्हणाले की, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दसरा मेळाव्याच्या माध्यमातूनही भाजपच्या हिंदुत्वाच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे जे स्वत:ला हिंदुत्ववादी म्हणायलाही घाबरतात अशा बेगडी निधर्मीवाद्यांना निवडून देण्याचे आणि आपल्या घराला आग लावून गंमत पाहण्याचे काम उद्धव ठाकरे कधीच करणार नाहीत.

सरकारची चार वर्षांतील कामगिरी, शिवसेनेसोबतचे संबंध, सिंचन घोटाळ्यातील सरकारची भूमिका, विरोधकांचे आरोप आणि निवडणूक तसेच दुष्काळामुळे पुढील वर्षभरातील सरकारसमोरील आव्हाने आदी अनेक मुद्दय़ावर आपली भूमिका मांडताना सहकारी मंत्र्यांचीही त्यांनी पाठराखण केली. आपल्या सरकारने गेल्या चार वर्षांत संख्यात्मक आणि गुणात्मक पातळीवर उत्तम कामगिरी केली आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळात विकास पथावरून घसरलेला महाराष्ट्र पुन्हा त्या मार्गावर आणण्यात आम्हाला यश आले आहे, असा दावाही त्यांनी केला. दुष्काळ निवारण हे सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# जकार्ताहून १८८ प्रवासी घेऊन निघालेले विमान समुद्रात कोसळले



**इंडोनेशियाच्या लायन एअरवेजचे प्रवाशांना घेऊन जाणारे विमान कोसळले आहे. उड्डाण केल्यानंतर १३ मिनिटानंतर विमानाशी संपर्क तुटला. शोध पथकातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार जावा समुद्र किनाऱ्याजवळ या विमानाचे अवशेष आढळून आले आहेत. हे विमान जकार्ताहून पान्गकल पिनांगला जात होते. परंतु, १३ मिनिटानंतर विमानाकडून कोणतीच सूचना न आल्याने एकच खळबळ उडाली. दुर्घटना घडल्याच्या शक्यतेने शोध आणि मदत अभियान सुरु करण्यात आले. विमानात क्रू मेंबरसह १८८ प्रवासी होते. अद्याप विस्तृत माहिती समजू शकलेली नाही.**

विमान कोसळल्याचे वृत्त 'रॉयटर्स' या वृत्तसंस्थेने शोध आणि मदत पथकातील अधिकाऱ्याच्या हवाल्याने दिले आहे. तत्पूर्वी इंडोनेशियन प्रशासनाने लायन एअर जेटी ६१० बरोबर आमचा संपर्क तुटला असून विमानाबाबत काहीच माहिती समजू शकली नसल्याचे म्हटले होते.

इंडोनेशियातील पेर्टीमिना ऊर्जा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानाचे अवशेष जावा समुद्रात दिसून येत आहेत. तर इंडोनेशियाच्या परिवहन मंत्रालयाने कोसळलेल्या विमानात क्रू मेंबरसह १८८ प्रवासी होते, असे सांगितले आहे.

सोमवारी सकाळी ६.३३ मिनिटांनी विमानाचा संपर्क तुटला. त्यानंतर प्रशासनाने डोंगर परिसरात शोध मोहीम सुरु केल्याचे वृत्त 'द स्ट्रेट्स टाइम्स'ने दिले होते. लायन एअरवेजचे प्रवक्ते डॅनंग मंडेला प्रिहान्टो यांनी विमानाशी संपर्क तुटल्याचे सांगितले. विमानाचे लोकेशन अद्याप निश्चित झाले नसल्याचे ते म्हणाले होते.

## सौजन्य व्हॉट्सअप




# 'मी टू'ला हवे शासन कायद्याचे भक्कम बळ

***उत्क्रांताच्या काळापासून ते आजच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि डिजिटल काळापर्यंत पुरुषांचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही. स्त्री म्हणजे भोगवस्तू होय हाच विचार आतापर्यंत पुरुषप्रधान संस्कृतीत रुजत आला आहे. आज स्त्री शिक्षणाने समृद्ध झाली आहे. ती स्वत:च्या पायावर उभी राहिलेली आहे. प्रत्येक क्षेत्रात पुरुषाशी स्पर्धा करून ती आर्थिकदृष्ट्या पुरुषावर अवलंबून राहिलेली नाही.***




आतापर्यंत लैंगिक शोषणाच्या मुद्द्यावरून बऱ्याच महिला संघटनांनी आवाज उठवला. महिला आयोगाची स्थापना झाली. महिला लेखकांनीसुद्धा आपल्या साहित्यातून आवाज उठवला. सरकार बदलले; पण शासन आणि न्यायालय स्तरावर कोणतीच ठोस पावले उचलली गेली नाहीत. विनयभंगापासून ते बलात्कार करून खुनापर्यंतच्या चौकशीमध्ये पोलीस प्रशासन आणि न्यायालयीन स्तरावर ७५ टक्के पुरुष अधिकाऱ्यांचा सहभाग असतो. आज स्वत:च्या पायावर उभी राहणारी स्त्री कोणत्याच क्षेत्रात सुरक्षित नाही. मग ते क्षेत्र सरकारी/खाजगी/मनोरंजन/खेळ/राजकीय असो. सरकारी सेवेत असणाऱ्या महिलांना वेतनवाढ/बढती/बदली या भीतीपोटी त्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या लैंगिक शोषणास बळी पडतात. खाजगी क्षेत्रामध्ये बेरोजगारीची समस्या असल्यामुळे कामगारांची संख्या जास्त आहे. त्यामुळे कामावरून काढून टाकण्याच्या / रोजगार जाण्याच्या भीतीपोटी महिलांना व्यवस्थापकाच्या लैंगिक शोषणास बळी पडावे लागते.

शासन आणि न्यायालय स्तरावर महिलांसाठी स्वतंत्र कार्यालये जलदगतीने स्थापन केली पाहिजेत. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक शोषणासाठी स्वतंत्र कायदा केला पाहिजे. प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष महिला कामगारांशी संपर्क साधून चौकशी केली पाहिजे. प्रत्येक कामाच्या ठिकाणी हेल्पलाइन नंबर असला पाहिजे. ज्या चित्रपटात गुन्हेगारी विश्वातील गुंतवणूक केली जाते त्याची चौकशी केली पाहिजे. परदेशात वास्तव्य करून राहणाऱ्या आणि भारतातील चित्रपट व्यवसायामध्ये भलीमोठी गुंतवणूक करणाऱ्या गुन्हेगारी विश्वातील म्होरक्यांच्या मुसक्या आवळून भारतात आणण्याची घोषणा करून सत्ता मिळवली। परंतु सत्ता संपण्याचा काळ आला तरी ही घोषणा हवेतच राहिली.

जगाच्या इतिहासामध्ये जेवढे राजे झाले त्यामध्ये शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांच्या राज्यामध्ये स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन चांगला होता. त्यांच्या राज्यात स्त्री सुरक्षित होती. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांचे महाराजांनी हात-पाय तोडले, तोफेच्या तोंडी दिले. त्या शिवाजी महाराजांच्या नावावर ज्यांनी पक्ष, संघटना काढल्या त्यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी काय ठोस योजना केल्या? कोणती एखादी भक्कम संघटना उघडली? सत्ता मिळविण्यासाठीच फक्त शिवाजी महाराजांच्या नावाचा वापर किती दिवस करायचा?

# प्रभादेवीत रंगणार दिवाळी महोत्सव

मुंबई काँग्रेस ब्लॉक क्रमांक १९४ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही दिवाळी महोत्सव व कविता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या शनिवारी ३ नोव्हेंबर २०१८ या दिवशी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत कलांगण, रवींद्र नाट्य मदिर, प्रभादेवी येथे करण्यात आले आहे. सामाजिक व राजकीय विषयावरील कवितांना स्पर्धेत स्थान देण्यात येईल ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून कोणतेही प्रवेश शुल्क आकारण्यात येणार नाही. ३१९४, ३१९४ व ११९४ अशी तीन, उत्तेजनार्थ दोन पारितोषिके व सन्मानचिन्ह देण्यात येतील तसेच सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देण्यात येईल.

तसेच सर्वांनी एकत्र येऊन दिवाळी साजरी करावी व एक दिवाळीचा फराळ करावा या उद्देशाने दिवाळी फराळाची व्यवस्था करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन मागील ६ वर्षांपासून मुंबई काँग्रेस ब्लॉक क्रमांक १९४ चे अध्यक्ष प्रशांत धुमाळ करत आहेत.

# पंतप्रधान आवास योजनेची कासवगतीने वाटचाल

## २०२२ पर्यंत १९ लाख घरांचे उद्दिष्ट; ७६ हजार घरांचे बांधकाम सुरू

***राज्यातील भाजप-शिवसेना युती सरकारने तीन वर्षांपूर्वी गाजावाजा करून सुरू केलेल्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत फक्त ७६ हजार घरांची बांधकामे सुरू आहेत. त्यामुळे २०२२ पर्यंत १९ लाख ४० हजार घरांचे उद्दिष्ट कसे पूर्ण होणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. 'सर्वासाठी घर' अशी घोषणा करीत देशात सर्व राज्यात पंतप्रधान आवास योजना सुरू करण्यात आली आहे.***

राज्यात जून २०१५ मध्ये ही योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअंतर्गत २०२२ पर्यंत १९ लाख ४० हजार घरे बांधणार असल्याचे जाहीर करण्यात आले. राज्यातील ३८३ शहरांमध्ये ही योजना राबवली जात आहे. योजनेत वेळोवेळी बदल करून, आता खासगी



विकासक आणि जमीनमालक यांना सहभागी करून घेऊन तसेच त्यांना एफएसआय व इतर सवलती देऊन या योजनेला गती देण्याचा प्रयत्न केला जात आहे. केंद्र सरकारने सुमारे साडेसहा लाख घरे बांधण्याचे प्रस्ताव मंजूर केले आहेत, अशी माहिती मेहता यांनी दिली. पंतप्रधान आवास योजनेला गती देण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ स्थापना करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यात म्हाडा, एसआरए, सिडको, नागपूर सुधार न्यास या संस्थांना सहभागी करून घेतले जाणार आहे. या संस्थांच्या वतीने गृहनिर्माण प्रकल्प हाती घेतले जातील. त्यात पंतप्रधान आवास योजनेसाठीही घरे बांधून घेतली जाणार आहेत. राज्य सरकारने अलीकडेच १ जानेवारी २००० ते २०११ पच्यच्या अनधिकृत झोपडपट्ट्यांनाही सशुल्क घरे देण्याचा निर्णय घेतला आहे. ही घरे पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधण्याचा प्रस्ताव आहे. सशुल्क असले तरी, मुंबईसारख्या महानगरात ३०० चौरस फुटांचे घर झोपडपट्टीधारकांना आठ लाखांत मिळणार आहे. त्यातही निकषात बसणाऱ्या लाभार्थ्यांना अडीच लाख रुपये अनुदान मिळणार आहे, असे मेहता यांनी सांगितले. पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आता ३० टक्के आर्थिक दुर्बलांसाठी, ३० टक्के अल्प उत्पन्न गटासाठी आणि ४० टक्के मध्यम उत्पन्न गटासाठी घरे बांधली जाणार आहेत. या योजनेच्या निकषात न बसणाऱ्या सर्व सामान्यांसाठीही घरे बांधली जातील आणि ती परवडणारी घरे असतील, असे त्यांचे म्हणणे आहे. एका प्रकल्पात किमान पाच हजार घरे बांधण्याचे बंधन राहणार आहे. सध्या ७६ हजार घरांचे बांधकाम सुरू आहे, अशी माहिती मेहता यांनीच दिली. त्यामुळे गेल्या तीन वर्षांतील या योजनेची वाटचाल पाहता, पुढील तीन वर्षांत १९ लाख ४० हजार घरांचे उद्दिष्ट पूर्ण होईल का हा प्रश्न आहे. उद्दिष्टाप्रमाणे घरबांधणीचे नियोजन केले आहे.

# उरकून घ्या, लवकर बँकिंग व्यवहार

## *बँका सलग पाच दिवस राहणार बंद!*

मुंबई - बँकेचे काही व्यवहार असतील तर ते लवकरच उरकून घ्या कारण दिवाळीतबँकांना पाच दिवस सुट्टी असल्याने नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे. ७ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर दरम्यान बँका बंद राहणार आहेत. बुधवारी ७ नोव्हेंबर रोजी लक्ष्मीपूजन, गुरुवारी ८ नोव्हेंबर रोजी दिवाळी पाडवा, शुक्रवारी ८ नोव्हेंबर रोजी भाऊबीज असल्याने बँका बंद असणार आहेत. तसेच १० नोव्हेंबरला दुसरा शनिवार आणि ११ नोव्हेंबरला रविवार असल्याने बँकेला सुट्टी आहे.

दिवाळीत बँका सलग पाच दिवस बंद राहणार आहेत. बँकांचे व्यवहार बंद असल्याने पैशाची कमतरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे नागरिकांना आर्थिक समस्यांना सामोरं जावं लागण्याची शक्यता आहे. रोखीच्या पैशासाठी नागरिक मोठ्या प्रमाणातून एटीएममधून पैसे काढण्यावर




भर देण्याची शक्यता असल्याने एटीएममध्येही रोख पैशाचा तुटवडा निर्माण होऊ शकतो. मात्र दरम्यानच्या काळात नागरिकांनीही कॅशलेस व्यवहारावर भर दिल्यास एटीएमवरचा ताण कमी होईल आणि रोख पैशाची चणचण भासणार नाही.

# पार्किंगच्या वादातून सात वाहने जाळली



मालाड पूर्वेकडील पाल नगर परिसरात बुधवारी मध्यरात्री रस्त्याकडेला उभी असलेली सात वाहने जाळण्यात आली. या प्रकरणी कुरार पोलिसांनी परिसरातील चार रहिवाशांना अटक केली. पाल नगर येथील चिंचोळ्या रस्त्यावर वाहने उभी करण्यावरून रहिवाशांमध्ये वाद होता. त्यातूनच वाहने पेटवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

कुरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक उदय राजशिर्के यांनी दिलेल्या माहितीनुसार, या रस्त्यावर पूर्वी रिक्षा उभ्या केल्या जात. अलीकडच्या काळात परिसरातील अन्य रहिवाशांकडे मोटरसायकल, चारचाकी वाहने आली. ती कुठे उभी करायची यावरून दोन महिन्यांपूर्वी मोठा वाद झाला होता. त्यातूनच ही वाहने जाळण्यात आली, अशी माहिती तपासातून पुढे आली आहे. अटक आरोपींची चौकशी सुरू आहे.

दोन गटांमध्ये हाणामारी झाली वाहने पेटवून दिली, अशी अफवा बुधवारी पसरली. परिमंडळ ११चे उपायुक्त संग्रामसिंग निशाणदार यांनी हाणामारीचे वृत्त फेटाळून लावले. वादातून हेतुपुरस्सर वाहनांचे नुकसान करण्यात आले, असे ते म्हणाले.

# फटाकेबंदी मोडल्यास कायद्याचे फटके

**मुंबई -** फटाके किती क्षमतेचे आणि कोणत्या वेळेत वाजवावेत याबाबत सर्वोच्च न्यायालयाने आदेश जारी केल्यानंतर त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी मुंबई पोलिसही सज्ज झाले आहेत. रात्री दहानंतर रस्त्यावर कोणी फटाके वाजविताना आढळल्यास न्यायालयाच्या विशेष आदेशाचा अवमान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल होऊ शकतो. त्यामुळे न्यायालयाने दिलेली वेळेची मर्यादा पाळा, असे आवाहन मुंबई पोलिसांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्बंधांनुसार पोलिस आयुक्त विशेष आदेश जारी करून याबाबतची माहिती सर्व पोलिस ठाण्यांना देतात. त्यानुसार रात्री दहानंतर फटाके फोडू नयेत, असे नागरिकांना वेगवेगळ्या माध्यमांमार्फत कळविले जाईल. कोणी या आदेशाचे उल्लंघन करताना आढळल्यास त्याच्यावर भा.द.वि. कलम १८८ किंवा अन्य कलमांद्वारे गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. हे कृत्य त्या व्यक्तीने पहिल्यांदा केले, अजाणतेपणी केले की कसे यावर न्यायालयात युक्तिवाद होईल.



न्यायालय दंड किंवा कारावासाची शिक्षा देऊ शकते. त्यामुळे रात्री उशिरा फटाके फोडू नयेत, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

दिवाळीच्या कालावधीत गस्त वाढविण्यात येणार असून, विशेषतः रात्री दहानंतर पोलिस गस्तींवर जास्त भर देण्यात येणार आहे. महत्त्वाच्या ठिकाणीही पोलिस तैनात करण्यात येणार आहेत. सोशल मीडिया, फोन कॉल्स यांवरून जशा तक्रारी येतील त्याप्रमाणे आम्ही कारवाई करू, असेही एका अधिकाऱ्याने सांगितले.

# 'कारभार सांभाळता येत नसेल तर मुंबई विद्यापीठ बंद करा'

**मुंबई – विधि अभ्यासक्रमासाठी ६०:४० पॅटर्न लागू करण्याच्या विद्यापीठाच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित करत उच्च न्यायालयाने विद्यापीठाला फैलावर घेतले. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ५३ विधि महाविद्यालयांमध्ये केवळ ४७ पूर्ण वेळ प्राध्यापक असल्याचे निदर्शनास आल्यावर उच्च न्यायालयाने विद्यापीठाला खडेबोल सुनावले. 'कारभार सांभाळता येत नसेल तर विद्यापीठ बंद करा,' अशा शब्दांत न्यायालयाने विद्यापीठाला सुनावले.**



तीन वर्षे विधि अभ्यासक्रमाची पहिली दोन वर्षे आणि पाच वर्षे विधि अभ्यासक्रमाची पहिल्या चार वर्षांची परीक्षा महाविद्यालयीन पातळीवर घेऊन ६०:४० पद्धतीने गुण देण्यात यावेत, असा निर्णय मुंबई विद्यापीठाने मे महिन्यात घेतला. या निर्णयाला प्राध्यापक दीपक चट्टोपाध्याय, जी.जे. अडवाणी महाविद्यालयाचा विद्यार्थी पार्थसारथी सराफ यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. या याचिकांवरील सुनावणी न्या. भूषण गवई व न्या. मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठापुढे होती.

दरम्यान, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाने विद्यापीठाने आपल्याला या निर्णयाची माहिती दिली नसल्याचे न्यायालयाला सांगितले. उच्च न्यायालयाने या पॅटर्नला दिलेली स्थगिती सोमवारपर्यंत कायम राहील.

# ई-तिकिटांची अवैध विक्री; आरपीएफची कारवाई



**मुंबई -** दिवाळीच्या सुट्टीत मेल, एक्स्प्रेस गाड्यांची तिकिटे उपलब्ध नसल्याने तिकीट एजंटांना मागणी वाढली आहे. रेल्वेच्या तिकीट यंत्रणेपेक्षाही जलद सॉफ्टवेअर वापरून अवैधरित्या ई-तिकिटे मिळवणाऱ्या एका एजंटची शनिवारी मानखुर्द येथून धरपकड करण्यात आली. या कारवाईत सुमारे दोन लाख मूल्यांची ४४ ई-तिकिटे जप्त करण्यात आली आहेत. प्राथमिक तपासात यापूर्वीही इंद्रजीत गुप्ता (३२) या आरोपीने सुमारे ५८ लाख किंमतीची दोन हजारांहून जास्त तिकिटे अवैधरित्या प्राप्त केल्याचे आढळून आले.

सुट्टीच्या हंगामात लांब पल्ल्यांच्या गाड्यांसाठीची मागणी कमालीची वाढते. त्यातून आरक्षित तिकिटे मिळत नसल्याने तिकीट एजंटांचा भाव वधारतो. त्यासाठी अव्वाच्या सव्वा दर आकारून एजंट तिकीट उपलब्ध करतात. त्यासाठी जलद सॉफ्टवेअरचा वापर करून गुप्ताप्रमाणेच अन्य एजंट ई-तिकिटे मिळवतात. अवैधरित्या ई-तिकिटे मिळत असल्याची माहिती मिळताच रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ)च्या तिकिटांच्या गैरव्यवहारावर लक्ष ठेवणारे विशेष पथक, दादरमधील आरपीएफ ठाण्यातील तुकडी, पनवेलमधील आरपीएफ गुन्हा अन्वेषण विभागाने शनिवारी ही संयुक्त कारवाई केली.

आरपीएफच्या मुख्यालयास मानखुर्दमध्ये ई-तिकिटांच्या अवैध व्यवहारांबाबत कुणकूण लागताच संयुक्त पथक स्थापन करण्यात आले. या पथकाने शनिवारी तिथे छापा टाकला असता अवैध तिकिटांचा कारभार स्पष्ट झाला. आताच्या कारवाईप्रमाणेच गुप्ताने यापूर्वीही ५८ लाख रुपये किंमतीच्या तिकिटांची विक्री केल्याचे उघड झाल्याने त्यातील गांभीर्य आणखी वाढले आहे. त्यामुळे आरपीएफच्या पथकानेही त्यानुसार चौकशी सुरू केली असून या रॅकेटमध्ये अन्य कोणी साथीदारांचा समावेश आहे का, हेदेखील तपासले जात आहे.

# लव्ह ट्रँगलमुळे मित्राची हत्या

## *रेल्वे पोलिसांनी ४८ तासांत ठोकल्या बेड्या*

मुंबई - प्रेयसीसोबत फिरत असल्याच्या कारणामुळे मित्राची हत्या करणाऱ्या ७ आरोपींना ४८ तासांत बेड्या ठोकण्यात रेल्वे पोलिसांच्या गुन्हे शाखेतील विशेष कृती दलाला यश आले आहे. मंगेश सरजिने असे या प्रकरणातील प्रमुख आरोपीचे नाव आहे. या हत्येत सहभागी असलेल्या अन्य ६ जणांनादेखील रेल्वे पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे.

रोमा (नावात बदल) माझी प्रेयसी असूनदेखील मैजुफूल तिच्या सोबत फिरत होता. याचा जाब विचारला असता मैजुफूलने मला बांबूने मारहाण केली होती. या गोष्टीचा राग मनात धरून बदला घेण्यासाठी मंगळवारी रात्री ११च्या सुमारास रे रोड स्थानकातील फलाट क्रमांक १वरील गेटजवळ मैफुजूलला घेरले. अन्य सहा जणांच्या मदतीने मैजुफूलला मारहाण केली. या वेळी चाकूने मैजुफूलच्या छातीवर वार करत जीवे मारल्याची कबुली आरोपी मंगेश सरजिने याने दिल्याची माहिती रेल्वे पोलिसांच्या पश्चिम परिमंडळ उप-आयुक्त आणि मध्य परिमंडळ उप-आयुक्त (अतिरिक्त भार) पुरुषोत्तम कराड यांनी दिली.

मंगेशसह प्रथमेश तरपे, रोहन खेडेकर, हृतिक कदम, अभिषेक पाटील, नीलेश ओझा आणि अमित मिश्रा या सहा तरुणांनादेखील गजाआड केले आहे. सर्व तरुण २१ वर्षांखालील असून काळाचौकी आणि घोडपदेव परिसरात राहणारे होते. सात आरोपींनी पूर्वनियोजन करत हा गुन्हा केल्याची माहिती रेल्वे पोलिसांनी दिली.

# प्लास्टिकविरोधी कारवाईत विघ्न?

**मुंबई - मुंबईत प्लास्टिक पिशव्यांविरोधातील कारवाई दिवाळीत अधिक कडक करताना दुकानदारांचा परवाना रद्द करण्याचे आदेश पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी दिले असले तरी या कारणावरून दुकानदारांचा परवाना रद्द करण्याची तरतूद कायद्यात नसल्याने महापालिकेची अडचण झाली आहे. पालिकेने आता या दृष्टीने कायदेशीर चाचपणी सुरू केली आहे.**

दिवाळीत प्लास्टिक पिशव्यांची विक्री आणि वापर मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता लक्षात घेता ही कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये दुकानदार, व्यापारी तसेच अन्य वस्तूंच्या विक्रेत्यांना प्लास्टिक पिशव्यांप्रकरणी दंड करण्यात आला असेल आणि त्यांच्याकडे पुन्हा प्लास्टिक आढळून आल्यास त्यांचा परवाना रद्द करण्याचे आदेश मंत्र्यांनी दिले. मात्र कायद्यात तरतूद नसल्याने विक्रेत्यांचा परवाना रद्द करण्याबाबत कायदेशीर चाचपणी महापालिकेच्या



वतीने सुरू करण्यात आली आहे.

फेरीवाल्यांचा विषय हाताळणाऱ्या उपायुक्त (विशेष) निधी चौधरी या दीर्घ रजेवर गेल्याने त्यांचा पदभार उपायुक्त विजय बालमवार यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. महापालिकेच्या वतीने प्लास्टिकविरोधी कारवाई सुरू असली तरी दिवाळीत मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर होऊ शकतो. ही बाब लक्षात घेऊन बालमवार यांनी प्लास्टिक पिशव्यांवरील कारवाई अधिक तीव्र करण्याच्या सूचना विभागाला दिल्या आहेत.

त्यानुसार दुकानदारांसह व्यापारी आणि विक्रेते यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. यामध्ये नागरिकांवर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जाणार नाही. या प्लास्टिक पिशव्यांचा साठा आणि त्याचा वापर करताना जर दुकानदार व व्यापारी आढळून आल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. परंतु जर त्या दुकानदार आणि व्यापाऱ्यावर यापूर्वी दंडात्मक कारवाई करण्यात आली असेल तर त्यांचा परवाना रद्द करण्याचाही विचार केला जाईल, असे बालमवार यांनी स्पष्ट केले.

# ५७ पोलिसांना कार्यमुक्तीची प्रतीक्षा



**मुंबई -** बदली होऊनही कार्यमुक्तीची 'ऑर्डर' न मिळाल्याने ५७ पोलिसांची अद्याप 'सुटका' झालेली नसून, मुंबई पोलिस आयुक्तालयातील अधिकारी या पोलिसांना आधीच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात चालढकलपणा करत असल्याचा आरोप होत आहे. हे पोलिस गेली सहा महिने कार्यमुक्त होण्याची वाट बघत असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनच अशी वागणूक मिळत असल्याने त्यांच्यात प्रचंड नाराजी आहे.

शिपाई ते सहायक उपनिरीक्षक पदावरील पोलिसांची आंतरजिल्हा बदली करण्यासाठी सन २०१७ मध्ये राज्य सरकारने मान्यता दिली. त्यानुसार मुंबई पोलिस दलातील ५७ पोलिसांनी आंतरजिल्हा बदलीसाठी अर्ज केले. त्यांनी दिलेल्या कारणांची शहानिशा करून त्यांच्या बदल्यांना एप्रिल महिन्यात मंजुरी देण्यात आली. सरकारी निर्णयानुसार बदली झालेल्या पोलिसाला तीन महिन्यांत कार्यमुक्त करावे, असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. मात्र, सहा महिने उलटूनही ते झालेले नाही. 'अधिकारी सुट्टीवर आहेत', 'तुमच्या प्रकरणावर कारवाई सुरू आहे', 'सर्वकाही नियमाप्रमाणे सुरू आहे', अशी उत्तरे पोलिस आयुक्तालयातून दिली जात असल्याचे हे पोलिस सांगत आहेत.

***'मॅट'मध्ये जाण्याची तयारी***

कार्यमुक्त होण्यासाठी सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ वाट पाहूनही पोलिस आयुक्तालयाकडून दखल घेतली जात नाही. पोलिस महासंचालक कार्यालयातूनही अनेक पत्रव्यवहार झाले; परंतु, त्यांनाही जुमानले जात नाही. लवकरात लवकर कार्यमुक्त न केल्यास 'मॅट'मध्ये दाद मागण्याचा विचार असल्याचे एका पोलिसाने सांगितले.

***घर नाही, जेवणाचेही हाल***

बदली मंजूर झाल्याने काही पोलिसांनी सरकारी घरे परत करण्यासाठी अर्ज केले. काहींनी भाड्याने राहत असलेली घरे सोडली. अनेकांनी आपल्या कुटुंबाला बदली झालेल्या ठिकाणी पाठवले. इतके करूनही अद्याप कार्यमुक्त न केल्यामुळे पोलिसांचे हाल होत आहेत. या पोलिसांना राहण्यास जागा नाही आणि कुटुंब बदलीच्या गावी पाठवल्याने जेवणाचेही हाल होत आहेत. कार्यमुक्त करायचेच नव्हते तर बदलीची विनंती का मान्य केली? असा संतप्त सवाल हे पोलिस करत आहेत.

# राज्यात कुष्ठरोगाचे अडीच लाख संशयित

**मुंबई - मुंबई महानगरपालिकेने २५ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर या काळात राबविलेल्या कुष्ठरुग्ण शोध मोहिमेमध्ये नव्याने आढळलेल्या कुष्ठरुग्णांची संख्या ४७ वर पोहचली आहे. यातील पाच रुग्ण हे बहुजिवाणू (पॉसिबॅसेलरी) वर्गातील असून यांपासून संसर्ग पसरण्याचा धोका असल्याचे या तपासणीमधून निदर्शनास आले आहे.**

राज्यभरात याच काळात राबविलेल्या कुष्ठरुग्ण शोध मोहिमेमध्ये अडीच लाख संशयित रुग्ण आढळले असून तब्बल सुमारे चार हजार रुग्ण नव्याने आढळले आहेत. राष्ट्रीय कुष्ठरोग निवारण कार्यक्रमांतर्गत राबविलेल्या शोध मोहिमेमध्ये शहरातील सुमारे १० लाख कुटुंबांपैकी ९१ टक्के म्हणजे सुमारे नऊ लाख कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले. यातील सुमारे ४७ लाख लोकसंख्येपैकी सुमारे २७ लाख व्यक्तींची तपासणी केली



गेली. २५ सप्टेंबर ते ९ ऑक्टोबर या काळात केलेल्या या तपासणीमध्ये सुमारे १७ हजार कुष्ठरोग संशयित रुग्ण आढळले आहेत. या रुग्णांना पुढील तपासणीसाठी जवळच्या आरोग्य केंद्रावर पाठविण्यात आले. शोधमोहिमेमध्ये एक स्वयंसेवक आणि एक विद्यार्थी असे २७०० चमू सहभागी झाले होते. प्रत्येक चमूने दरदिवशी २५ घरांचे सर्वेक्षण केले आहे.

१४ ऑक्टोबपर्यंत सुमारे १७ हजार संशयित रुग्णांपैकी केवळ ४४ टक्के रुग्ण आरोग्य केंद्रावर तपासणीसाठी पोहोचले होते. यात नव्याने आढळलेल्या कुष्ठरुग्णांची संख्या २८ होती. उर्वरित ५६ टक्के संशयित रुग्ण आरोग्य केंद्रावर आलेच नसल्याने पालिकेच्या डॉक्टरांनी गेल्या दहा-बारा दिवसांपासून त्यांच्या घरोघरी भेट देऊन तपासणी सुरू केली आहे. या तपासणीमध्ये नव्याने १९ कुष्ठ रुग्ण आढळले आहेत. तेव्हा आधीचे २८ आणि हे १९ असे एकूण ४७ कुष्ठरुग्ण शहरामध्ये नव्याने आढळले आहेत.

# विमानतळावर ८७ लाखांचे सोने पकडले

मुंबई : छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमातनळावर ८७ लाख ५१ हजार रुपये किमतीचे सोने जप्त करण्यात आले. कस्टम विभागाने ही कारवाई केली. बँकॉक येथून मुंबईला येत असताना, जितेंद्र बाबुलाल सोलंकी या प्रवाशाकडे दोन हजार ९९७ ग्रॅम वजनी सोने असल्याची माहिती कस्टम अधिकाऱ्यांना मिळाली. मुंबई विमानतळावर सोलंकीची तपासणी केली असता, त्याच्याकडील मोबाइलच्या कव्हरमध्ये सोने आढळून आले. सोलंकीकडील सोने जप्त करण्यात आले असून, त्याला अटक करण्यात आल्याची माहिती कस्टम विभागाने दिली.

# कोकेन तस्करी; नायजेरीयनला बेड्या

मुंबई : परदेशी ड्रग्ज तस्करांविरुद्ध अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोहीम छेडली आहे. त्याचाच भाग म्हणून शुक्रवारी कोकेन तस्करी प्रकरणी उच्चैना ओवील (३२) या नायजेरीयन तस्कराला अटक केली आहे. त्याच्याकडून ५० ग्रम कोकेन जप्त करण्यात आले आहेत. ओवील हा कोपरखैरणे परिसरात वास्तव्यास होता. पूर्व द्रुतगती मार्गावर ही कारवाई करण्यात आली आहे.

## संपादकीय...

# जायकवाडीचा तिढा



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

भविष्यात पाण्यावरून युद्धे होतील असे अनुमान जेव्हा केले गेले, तेव्हा अनेकांना ती अतिशयोक्ती वाटली असेल. परंतु, सध्या सर्वत्र सुरू असलेले पाणीतंटे बघितले की त्याची सत्यता पटते. अलीकडच्या काळात पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. पर्जन्यराजाच्या लहरीपणाचा फटका शेती, उद्योगासह सर्वसामान्यांनाही आताशा बसू लागला आहे. यंदा पावसाने सगळीकडेच ओढ दिली. परतीचा पाऊस तर परागंदाच झाला. धरणेही पूर्ण क्षमतेने भरली नाहीत. खरिपाची पार वाट लागली आणि रब्बीदेखील हाती येईल की नाही, याची बळीराजाला भ्रांत पडली आहे. ऐन पावसाळ्यातच असंख्य गावांची तहान भागविण्यासाठी टँकर सुरू ठेवावे लागले, यावरून दुष्काळाची भीषणता ध्यानी यावी. अवर्षणाचा शाप भाळी घेऊनच मराठवाड्यातील जगरहाटी वर्षानुवर्षे सुरू आहे. यंदा तर परिस्थिती अंमळ अधिकच गहिरी असल्याने नगर व नाशिक जिल्ह्यातून नऊ टीएमसी पाणी सोडण्याचा आदेश झाला आहे. त्याविरोधात या दोन्ही जिल्ह्यात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. अपेक्षेप्रमाणे आंदोलनादी मार्गांबरोबरच न्यायालयाचे दरवाजेही ठोठावण्यात आले आहेत. दोन वर्षांपूर्वी उद्भवलेली परिस्थिती पुन्हा एकदा संकट बनून समोर आली असून, समन्यायी पाणीवाटपाचा तिढा आणखी जटील बनला आहे. मेंढेगिरी समितीच्या अहवालाच्या आधारे जायकवाडीला पाणी सोडणे बंधनकारक आहेच; पण यंदा नगर व नाशिक जिल्ह्यांमध्येही पाऊसमान कमी झाल्याने आताच पाणी सोडणे हे अन्यायकारक असल्याची भावना आहे.



जायकवाडीत सध्या ५३ टीएमसी पाणी असले तरी त्यातील २६ टीएमसी मृतसाठ्याचा वापर करण्यावर बंधन आहे. त्यामुळे, उर्वरित २७ टीएमसी पाणीसाठ्यावर मराठवाड्यातील चार जिल्ह्यांचा सारा जीवनव्यवहार अवलंबून आहे. धरणांमधील पाणी वापराचेही निकष ठरलेले असल्याने या पाण्यातून पिण्यासाठी, शेती व उद्योगांना उतरत्या क्रमाने वाटा दिला जातो. दुष्काळी स्थितीचा विचार करता शेती व उद्योगांऐवजी केवळ पिण्याच्या पाण्याला अग्रक्रम द्यायला हवा, अशी एक धारणा आहे. जायकवाडीला नियमानुसार पाणी देताना त्याचा वापर हा सिंचन व उद्योगासाठी होईल हा मुख्यत्वे नगर व नाशिककरांचा आक्षेप आहे. या दोन्ही जिल्ह्यातील धरणांमध्ये सध्या ८० टक्क्यांहून अधिक जलसाठा असला तरी धरणांमधील प्रत्यक्षातील उपयुक्त जलसाठा कमी असून, येथील शेती उजाड करून मराठवाड्याची शेती का फुलवायची, असा सवाल ही मंडळी करीत आहेत. मुळात या तीनही भागांचे पाण्यावरील दावे त्यांच्या दृष्टीने योग्य असले आणि त्यावरून कोणीही मागे हटणार नसले तरी सरकारने यात वेळीच हस्तक्षेप करायला हवा. परंतु, राजकीय अपरिहार्यतेमुळे हे विषय न्यायालयाकडे ढकलले जातात. मुळात जलव्यवस्थापन हा विषय आपल्याकडे कधीच गांभीर्याने पाहिला गेला नाही. पाण्यावरून तंटे-बखेडे उभे राहिले की तात्पुरती मलमपट्टी करून वेळ निभावून नेली जाते. आताही तेच केले जात आहे. मेंढेगिरी समिती नियुक्त करून पाणीवाटपावर तोडगा काढण्याच्या दिशेने पुढचे पाऊल पडले होते; पण या समितीच्या अहवालाचा पाच वर्षांनी आढावा घेण्याबाबत असलेल्या सूचनेला केराची टोपली दाखवली गेली आणि आता आग लागल्यावर विहीर खोदण्याचा प्रयत्न होत आहे. पाण्यावर सर्वांचा हक्क आहे, हे सांगणे सोपे आहे; पण त्या हक्कात कोणालाही वाटेकरी होऊ द्यायला हे तथाकथित मालक तयार नाहीत. जगा आणि जगू द्या, हे वचन प्रवचनापुरतेच उरले आहे. कारण या संघर्षाचा पायाच मुळी 'आम्हाला जगू द्या तुमचे काय करायचे ते तुम्ही बघा', या स्वार्थावर आधारित आहे. त्यासाठी मग जायकवाडीच्या पाण्याचा मद्यनिर्मितीसाठी किती व कसा वापर होतो, तेथील बीअर लॉबी हा संघर्ष कसा प्रायोजित करते, बाष्पीभवनाची आकडेवारी कशी खोटी आहे, अशा मुद्द्यांचा बचावासाठी आधार घेतला जातो. भरपूर पाऊस पडणाऱ्या प्रदेशातून पाणी मिळविण्यासाठी तुटीच्या खोऱ्यात उभे राहणारे असे संघर्षाचे वातावरण सगळीकडेच पहावयास मिळत आहे. राजकीय व स्थानिक विरोध, अनुशेषाचा मुद्दा, समन्यायी वाटप यामुळेही हा विषय संवेदनशील होऊन बसला आहे. 'जलयुक्त शिवार योजना' कशी यशस्वी झाली, याचे भलेथोरले आकडे नुकतेच सांगितले गेले. आता त्याच मराठवाड्यात जलसंकट कसे गहन झाले आहे, हे या संघर्षातून पुढे येत आहे. आज डोकी तापलेली असल्याने कोणीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नाही. पण आज ना उद्या यावर सर्वसहमती करणे, हेच सर्वांच्या व्यापक हिताचे आहे.

# परंपरागत फटाक्यांच्या उत्पादनावरच बंदी का नाही?

**दिवाळीत फटाके उडवण्यावर सर्वोच्च न्यायालयाने निर्बंध घातल्यामुळे देशभर चर्चेला तोंड फुटले आहे. एका वर्गाला हा हिंदुत्वावरील घाला वाटत आहे, तर काही जणांना फटाका उद्योगात कार्यरत कामगारांच्या कुटुंबांच्या चिंतेने ग्रासले आहे. फार थोड्या लोकांना सर्वोच्च न्यायालयाचा निणर्य योग्य वाटत आहे. यापूर्वी इतर काही घातक गोष्टींवर घालण्यात आलेल्या बंदीचा पूर्वानुभव लक्षात घेता, फटाके उडवण्यावर निर्बंध लादण्याच्या निणऱ्याचा फार परिणाम होईल असे वाटत नाही.**



संपूर्ण गुजरात राज्यात आणि महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये दारुबंदी आहे. काही वर्षांपूर्वी गुटख्यावर बंदी लादण्यात आली. शाळा-महाविद्यालयांनजीक गुटखा, तंबाखू, सिगारेट, विडी यासारख्या वस्तूंच्या विक्रीवर बंदी आहे. काय उपयोग झाला त्याचा? बंदी लादणारे आणि तिच्या अंमलबजावणीची जबाबदारी असलेल्यांसह सगळ्यांनाच वस्तुस्थितीची जाणीव आहे. ढोंग करणे, अवडंबर माजवणे यामध्ये आम्हा भारतीयांचा हात कुणीच धरू शकत नाही. एखाद्या गोष्टीवर बंदी लादतानाच तिचे पुढे काय होणार आहे, हे आम्हास ठाऊक असते; मात्र तरीदेखील तो सोपस्कार आम्ही पार पाडतो. याला ढोंग, अवडंबर नाही म्हणायचे तर काय म्हणायचे?

गत काही वर्षांपासून दिवाळीच्या दिवसात सकाळच्या वेळी राजधानी दिल्लीवर धुके आणि धुराची जाड चादर पसरते. त्या दिवसात वायू प्रदुषणाची पातळी प्रचंड वाढलेली असते आणि त्यासाठी फटाके कारणीभूत असतात. देशातील इतर शहरांमध्ये अद्याप परिस्थिती दिल्लीएवढी भयंकर झालेली नसली तरी, श्वसनाचे आजार असलेल्यांना, विशेषत: दम्याच्या रुग्णांना, दिवाळीच्या काळात जगणे नकोसे होते, ही वस्तुस्थिती आहे. फटाक्यांच्या धुरातील घातक रसायने वृद्ध, लहान मुले आणि रुग्णांसाठी अत्यंत घातक सिद्ध होतात; कारण त्यांची प्रतिकार शक्ती कमी असते. फटाक्यांच्या धुरातील काही घातक रसायनांमुळे अल्मायझर्स, थायरॉईड कॉम्प्लिकेशन्स, एवढेच नव्हे तर फुफ्फुसाचा कर्करोगही होऊ शकतो. काही फटाक्यांचे आवाज एवढे मोठे असतात, की त्यामुळे श्रवण क्षमतेवरही परिणाम होऊ शकतो. याशिवाय जवळपास दरवर्षीच देशात कुठे ना कुठे फटाक्यांमुळे आग लागण्याच्या घटना घडतात आणि त्यामध्ये वित्त व जीवित हानी होते.

फटाक्यांचे एवढे जीवघेणे दुष्परिणाम लक्षात घेता फटाक्यांच्या वापरावर केवळ निर्बंध न लादता, सरसकट बंदी लादणेच योग्य ठरेल आणि तीदेखील फटाके विक्रीवर नव्हे तर उत्पादनावरच घालायला हवी. दुर्दैवाने असा विचार कुणी मांडला रे मांडला, की लगेच फटाका उद्योगावर अवलंबून असलेल्या काही लाख लोकांचे कसे होणार, सुमारे २० हजार कोटी रुपयांचा उद्योग बुडवून कसे चालेल, असे गळे काढण्यात येतात. मग हाच न्याय समाजासाठी घातक असलेल्या इतर सगळ्या गोष्टींना लावणार का? हातभट्टीची दारू, वरली मटका, यासारख्या अनेक अवैध व्यवसायांवरही अनेक कुटुंबांची गुजराण होते. मग ते उघड्यावर येतील म्हणून त्या व्यवसायांना परवानगी द्यायची का?

सर्वोच्च न्यायालयाने फटाके फोडण्यासाठी केवळ दोन तासांपुरती परवानगी दिली खरी; पण त्या वेळेच्या आधी किंवा नंतर फटाके फुटणार नाहीत, याची खातरजमा करण्यासाठी सरकार किंवा सर्वोच्च न्यायालयाकडे कोणती यंत्रणा आहे? सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्देशांची या देशात खुलेआम अवहेलना सुरू असते. निर्भयाच्या बलात्कार प्रकरणानंतर वाहनांच्या काचांना काळी फिल्म नको, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. आजही अनेक शहरांमध्ये काचांना काळी फिल्म लावलेल्या अनेक गाड्या बिनदिक्कतपणे आरटीओ व पोलिस अधिकाऱ्यांसमोरून फिरत असतात. नुकताच केरळमधील शबरीमला मंदिरात महिलांना प्रवेश देण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. अद्याप एकही महिला त्या मंदिरात पाय टाकू शकलेली नाही. फटाके फोडण्यावरील निर्बंधाचे यापेक्षा वेगळे काही होण्याची अपेक्षा नाही. पोलिस लक्ष तरी कुठे कुठे देणार? जिथे रात्री दहा वाजल्यानंतर लाऊडस्पीकर वाजविण्यावरील बंदीचीही ते अंमलबजावणी करू शकत नाहीत, तिथे घराघरात फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांवर ते लक्ष तरी कसे ठेवणार? ते स्वत:च्या मुलांना तरी फटाके फोडण्यापासून रोखू शकणार आहेत का?

फटाके फोडण्यावरील निर्बंधांचे काय होणार हे स्पष्ट दिसत असल्यामुळे, सरकारने किंवा सर्वोच्च न्यायालयाने थेट परंपरागत फटाक्यांच्या उत्पादनावरच बंदी घालण्याचा विचार करण्यास काय हरकत आहे? किमानपक्षी ध्वनी व वायू प्रदुषणास कारणीभूत ठरणाऱ्या फटाक्यांच्या तरी उत्पादनावरच बंदी घालायला हवी. वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (सीएसआयआर) मधील वैज्ञानिकांनी प्रदुषणाची पातळी लक्षणीयरित्या कमी करणारे हरित फटाके तयार करण्यात यश मिळविले आहे. या संशोधनाला आणखी चालना दिली आणि विकसित झालेले तंत्रज्ञान फटाका उद्योगास उपलब्ध करून दिले तर त्या उद्योगावर अवलंबून असलेल्या लोकांच्या पोटावरही पाय येणार नाही आणि प्रदुषणालाही आळा घालता येईल. हरित फटाक्यांचे तंत्रज्ञान पूर्णत: विकसित करण्यासाठी संशोधन संस्थांना आणि त्याच्या वापरासाठी फटाका उद्योगास मुदत घालून द्यायला हवी. त्यानंतर परंपरागत फटाक्यांवर पूर्णत: बंदी लादायला हवी. यासाठी एक कालबद्द कार्यक्रम तयार करून त्याची काटेकोर अंमलबजावणी केल्यास काही वर्षात फटाक्यांमुळे होत असलेल्या प्रदुषणास मोठ्या प्रमाणात आळा घालता येईल, कुणाच्या भावनाही दुखावणार नाहीत आणि फटाका उद्योगावर अवलंबून असलेले लोक बेरोजगार होण्याचा धोकाही टाळता येईल. प्रश्न हा आहे, की त्यासाठी आवश्यक असलेली इच्छाशक्ती सरकार दाखवणार आहे का?

# वाहतूक पोलीस हतबल : इंदिरा गांधी चौकात सहावा अनधिकृत स्टँड?

**डोंबिवली** - इंदिरा गांधी चौकामध्ये नव्याने सहावा अनधिकृत रिक्षा स्टँड होण्याची शक्यता आहे. महापालिकेच्या उपविभागीय इमारतीसमोरच्या कैलासचंद्र मेहता मार्गालगत हा स्टँड तयार होत असून त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत आहे. त्यासंदर्भात स्थानिकांनी वाहतूक पोलिस कर्मचा-यांना सूचित करूनही त्यांनी हतबलता दर्शवल्याने नागरिकांमध्ये पोलिसांच्या अकार्यक्षमतेबद्दल नाराजीचे वातावरण आहे. या चौकात टाटा लेन, कल्याण, गांधीनगर-पीअँडटी कॉलनी, एमआयडीसी, तसेच शहरातील अन्य भागात जाणारे स्टँड असतांनाच आता शनिमंदिर, मानपाडा, स्टार कॉलनी आदी भागात जाण्यासाठीचा स्वतंत्र स्टँड वाहतूक पोलिसांच्या डोळयांदेखतच रिक्षा एकामागोमाग एक उभ्या करण्यात येत आहेत.



पाटकर रोड वगळता या ठिकाणी असलेले स्टँड हे अनधिकृत असल्याचा अहवाल वाहतूक विभाग, आरटीओ, महापालिका या तिन्ही संस्थांच्या पाहणी अहवालातच स्पष्ट झाले होते. त्यात आता आणखी एक स्टँड नागरिकांच्या गैरसोयीत भर घालत आहे. एसटी महामंडळाच्या पनवेल बस स्टँडनजीक या रिक्षा उभ्या असतात. सध्या एका वेळी सात, आठ रिक्षा उभ्या रहात असल्या तरी गर्दीच्या वेळेत या रिक्षा चौकातील वाहतूक कोंडीमध्ये भर घालतात. त्यामुळे शहराचे वाहतूक नियोजन सपशेल कोलमडते. त्यातच महापालिकेसमोरील जागेत उभ्या असलेल्या दुचाकींवर वाहतूक नियंत्रण विभागाच्या टोईंग व्हॅन चालकांची मेहेरनजर असल्याने तेथील दुचाकींवर कारवाई होत नसल्याची टीका उघडपणे होत आहे.

एकीकडे गुरूवारी दिवससभरात ११० बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई केली जाते, पण पोलिसांच्या डोळयादेखतच होणा-या गैरसोयीवर मात्र त्या विभागाचा अंकुश नसल्याची टीका नागरिकांमधून उघडपणे केली जात आहे. या सर्व अनागोंदी कारभारामुळे या ठिकाणी इंदिरा गांधी चौक नको तर रिक्षा चौक असे त्या चौकाचे नामकरण करण्याची उपहासात्मक टीका वास्तूविशारद अलंकार तायशेटे, स्नेहा तायशेटे यांनी केली. वाहतूक नियमाप्रमाणे लेन ची शिस्त दाखवा अन् बक्षिस मिळवा अशी विदारक स्थिती या ठिकाणी आहे. वाहतूक पोलिसांच्या डोळयादेखत हे सगळे होत असल्याचे शल्य आहे. यासंदर्भात इंदिरा गांधी चौकामधील वॉर्डन, वाहतूक विभागाच्या पोलिस कर्मचा-यांना विचारले असता, आम्ही त्यांना हटकतो, पण ते पुन्हा येवून उभे रहात असल्याचे सांगत हतबलता दर्शवली.

# नवी मुंबई विमानतळाचे काम बंद पाडले

**नवी मुंबई** - नवी मुंबई विमानतळाच्या कामामुळे येथील गाभा क्षेत्रातील गावांमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. पारगाव डुंगी, वरचा ओवळा ही गावे विस्थापित होणार नसल्याने या गावांना येथेच रहावयाचे आहे. मात्र या गावांच्या




शेजारची गावे यात विस्थापित होणार असल्याने विमानतळाच्या कामाचा थेट परिणाम या गावांवर होऊ लागला आहे. येथे वारंवार होणाऱ्या स्फोटांमुळे गावांना हादरे बसत असून गावात धुळीचे साम्राज्य पसरले आहे. शिवाय गावातील आणि गावाशेजारील रस्त्यांची विमानतळाच्या कामामुळे दुरवस्था झाली असून वाहनांच्या आवाजाने ध्वनिप्रदूषणाचा सामनाही ग्रामस्थांना करावा लागत आहे. या गावातील समस्या सोडविण्याकडे सिडको दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत गुरुवारी येथील ग्रामस्थांनी विमानतळाचे तीन ठिकाणी सुरू असलेले काम बंद पाडले आणि कामाच्या ठिकाणीच ठिय्या आंदोलन करत सिडकोच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

विमानतळाच्या उभारणीसाठी दहा गावे विस्थापित होणार आहेत, मात्र या दहा गावांना लागून असलेली अन्य गावे आहे त्याच ठिकाणी राहणार आहेत. या गावांमध्ये पारगाव, डुंगी, वरचा ओवळा या गावांचा समावेश आहे. या गावाच्या पुढची गावे उठली असून आता ही गावे विमानतळाच्या सीमारेषेवर आली आहेत. त्यामुळे विमानतळाच्या कामाचा थेट परिणाम या गावांवर होत आहे, असा आरोप ओवळे ग्रामस्थांनी केला आहे. यासाठी बेकायदा होत असलेले टेकडी सपाटीकरणासाठीचे स्फोट घडविण्याचे काम थांबवावे आणि रीतसर ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींसमोर कायदेशीर स्फोट घडवून त्याचा अहवाल सादर करावा, मान्यतेपेक्षा जास्त क्षमतेचा स्फोट घडविल्यामुळे अनेक घरांचे नुकसान झाले आहे. त्यांना हादरे बसून तडा गेल्या आहेत. त्यांना नुकसान भरपाई मिळावी. उलवे टेकडी सपाटीकरणाच्या कामामुळे हवा, पाणी आणि ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे सर्वांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे किमान आरोग्य सेवा या ग्रामस्थांसाठी सुरू कराव्यात, अश्या मागण्या ग्रामस्थांनी केल्या आहेत.

# बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यास नकार देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचं निलंबन

बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यास नकार देणाऱ्या नवी मुंबईतील पोलीस अधिकाऱ्याचं निलंबन करण्यात आलं आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश जाधव यांच्याविरोधात विभागीय चौकशीचा आदेश देण्यात आला आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्त संजय कुमार यांनी हा आदेश दिला आहे.



महेश जाधव यांच्यावर तक्रारदार महिलेला ५० हजार रुपयांची ऑफर दिल्याचा आरोप असल्याची माहिती संजय कुमार यांनी दिली आहे. प्रकरण मिटवण्यासाठी हे पैसे आरोपीच्या कुटुंबीयांकडून महिलेला देण्यात येणार होते. दरम्यान या प्रकरणात अजून एका पोलीस अधिकाऱ्याचं नाव आलं असून सध्या त्याच्यावर नजर आहे. पोलीस उपायुक्त अशोक दुडे प्राथमिक चौकशी करत असून त्यातून समोर येणाऱ्या माहितीच्या आधारे या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल.

एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिलेल्या माहितीनुसार, महेश जाधव यांच्यावर आरोप करु शकत नाही कारण पोलीस गुन्हा दाखल करण्यास तयार होते, मात्र तक्रारदार महिलेने थोडा वेळ मागितला होता. महिला आपल्या काही मित्रांसोबत पोलीस ठाण्यात आली होती. यावेळी तिने तक्रार करण्याआधी थोडा विचार करायचा असल्याचं पोलिसांना सांगितलं होतं.

मात्र महिलेचे वकील महेश वासवानी यांनी हा दावा फेटाळून लावला आहे. 'जर हे खरं असेल तर पोलिसांनी फक्त अदखलपात्र गुन्हा का दाखल केला', असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. आरोपीच्या कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात तक्रारदार महिलेला मारहाण करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. पोलीस सीसीटीव्ही फुटेज जारी का करत नाहीत असा सवाल त्यांनी विचारला आहे.

महिलेने जेव्हा पोलीस आयुक्त संजय कुमार यांच्याकडे तक्रार केली तेव्हा कुठे पोलिसांनी हालचाल करण्यास सुरुवात केली असं महेश वासवानी यांनी सांगितलं आहे. गुरुवारी पोलिसांनी बलात्काराच्या आरोपाखाली श्रीजीथ जॉन याला अटक केली. शनिवारी रात्री घरी पार्टीदरम्यान महिलेवर बलात्कार केल्याचा आरोप आहे.

# हिरानंदानी बिल्डरकडे खंडणी मागितल्याप्रकरणी भाजपाच्या सुधीर बर्गे यांना अटक

**ठाणे :** भाजपाच्या सुधीर बर्गे यांच्यासह तिघांना शनिवारी खंडणी मागितल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. ठाण्यातील प्रसिद्ध हिरानंदानी बिल्डरकडे खंडणी मागितल्याप्रकरणी सुधीर बर्गे यांच्यासोबतच माहिती अधिकार कार्यकर्ते शौकत मुलानी आणि आरिफ इराकी यांना अटक करण्यात आली आहे. माहिती अधिकार आणि जनहित याचिकेच्या माध्यमातून या तिघांकडून खंडणी उकळली जात होती, असे सांगण्यात येत आहे.

आरटीआय कार्यकर्त्यांचे खंडणी उकळणारे रॅकेट ठाणे आणि मुंबईत कार्यरत असल्याची तक्रार सहा महिन्यांपूर्वी शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर सुधीर बर्गे, शौकत मुलानी आणि आरिफ इराकी यांची नावे समोर आली.

# भाईंदरध्ये तीन तृतीयपंथीयांना भाईंदरमध्ये मारहाण

**भाईंदर** - भाईंदर पश्चिमेला तीन तृतीयपंथींना बेदम मारहाण झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तिघांना बेदम मारहाण झाल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत.

भाईंदर पश्चिमेला स्टेशनजवळील रस्त्यावर ही घटना शुक्रवारी दुपारी घडली. दिवाळी जवळ आल्याने दिवाळीसाठी हे तिघे तृतीयपंथी दुकानदारांकडे पैसे मागत होते. एका दुकानदाराकडे त्यांनी पैसे मागितले तेव्हा वाद सुरू झाला. 'तुम्हाला काही कामधंदा नाही का' असे विचारत या तृतीयपंथीयांना शिवीगाळ करण्यात आली. हा वाद वाढल्याने दुकानातील व्यक्ती व महिलेने आणखी काही तरुणांना तेथे बोलावले. त्यानंतर २० ते २५ जणांनी बेदम मारहाण केली, असे या तृतीयपंथीयांनी तक्रारीत म्हटले आहे.

दुकानदाराकडे भीक मागताना वाद होऊन ही मारहाणीची घटना घडली आहे. मारहाण करणारे लोक अज्ञात आहेत. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे, असे भाईंदर पोलिसांनी सांगितले. हाताने, काठी, बांबूने मारहाण करण्यात आली. गुन्हा



नोंद करून आता पुढील तपास करू असे पोलिस निरिक्षकांनी सांगितले. या घटनेमुळे संतापलेले तृतीयपंथी न्याय मिळण्याच्या मागणीसाठी पोलिस ठाण्याबाहेर जमले होते.

# आधार ई-केवायसी वापर बंद करा

## सरकारचे टेलिकॉम कंपन्यांना निर्देश



**नवी दिल्ली** - मोबाइल फोनधारकांची खासगी माहिती पडताळणीसाठी किंवा नवीन सिम कनेक्शन देण्यासाठी टेलिकॉम कंपन्यांनी आधार कार्डची मागणी करणं बंद करण्यास सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी सरकारने शुक्रवारी हे निर्देश जारी केले आहेत. सुप्रीम कोर्टानं गेल्या महिन्यात महत्त्वपूर्ण निर्णय देताना, कायदेशीर तरतुदींच्या अभावामुळे खासगी कंपन्यांद्वारे होणारा आधार ईख्य्च्या वापर करणं बंद करण्यास सांगितले होते. कोर्टाच्या आदेशाचे पालन करण्यासाठी दूरसंचार विभागाने टेलिकॉम कंपन्यांसाठी तपशीलवार दिशानिर्देश जारी केले आहेत. यामध्ये कंपन्यांना आधारद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात ई-केव्हायसीचा वापर करणं थांबवण्यास सांगितले आहे. शिवाय, यासंबंधीचा अहवाल ५ नोव्हेंबरपर्यंत देण्यास सांगितला आहे.

दूरसंचार विभागानं आपल्या ३ पानांच्या परिपत्रकात म्हटले आहे की, ग्राहकांच्या खासगी माहितीच्या पडताळणीसहीत त्यांना नवीन सिम कनेक्शन देण्यासाठी आधार ई-केव्हायसीचा उपयोग केला जाऊ शकत नाही. दरम्यान, जर नवीन कनेक्शनसाठी ग्राहक स्व-ईच्छेनं आधार कार्डची प्रत पुरवत असेल तर कागदपत्रांच्या स्वरुपात त्याचा वापर केला जाऊ शकतो. पण याचा ऑफलाइनच वापर केला जाऊ शकतो. शिवाय, सर्व टेलिकॉम कंपन्या वेळबद्ध पद्धतीनं या आदेशाचे पालन सुनिश्चित करतील, असेही यात सांगण्यात आले आहे.

दूरसंचार विभागाच्या अनुसार, मोबाइल ग्राहकांना पर्यायी डिजिटल प्रक्रिया उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामध्ये कस्टमर एक्विझिशन फॉर्मसहीत ग्राहकांना फोटोसोबत ओळख आणि पत्त्यासाठी स्कॅन कॉपीचा उपयोग करता येईल. या पार्श्वभूमीवर नवीन ग्राहकांसाठी सर्व डिजिटल प्रक्रिया असतील.


# भारतात लवकरच धावणार विनाइंजिन रेल्वे



रेल्वे म्हटले की त्याला त्याला इंजिन असणार असे आपल्याला अगदी सहज वाटून जाते. पण इंजिनशिवायची रेल्वे तुम्ही कधी पाहिलीये? नाही ना? पण आता इंजिनशिवाय रेल्वे तुम्हाला भारतात दिसू शकते. याचे कारण म्हणजे भारताची पहिलीच इंजिन नसलेली ट्रेन रुळावर परिक्षणासाठी येणार आहे. ही ट्रेन शताब्दी एक्स्प्रेसची जागा घेणार आहे, यात वापरण्यात आलेल्या तंत्रज्ञानामुळे ही ट्रेन नेहमीच्या ट्रेनपेक्षा जास्त वेगाने धावणार आहे. एकूण १६ डब्यांच्या या ट्रेनचे नाव 'ट्रेन १८' असे असते. २९ ऑक्टोबरला ही ट्रेन परिक्षणासाठी जाणार आहे. त्यानंतर सर्व नियमांतून पास झाल्यावर ही ट्रेन प्रत्यक्ष रुळावर येईल. या ट्रेनला चेन्नईतल्या इंटिग्रल कोच फॅक्ट्री (आयसीएफ) मध्ये १८ महिन्यांमध्ये तयार करण्यात आलं आहं. या ट्रेनच्या प्रतिकृतीसाठी १०० कोटी रुपयांचा खर्च आला असून भविष्यात त्याच्या निर्मितीचा खर्च कमी होईल असा अंदाज आहे.

या ट्रेनचं अनावरण २९ ऑक्टोबरला अनावरण झाल्यानंतर रिसर्च डिझाईन अॅण्ड स्टॅण्डर्ड ऑर्गनायजेशन (आरडीएसओ)कडे ही ट्रेन पुढच्या परिक्षणासाठी पाठवण्यात येईल. या ट्रेनच्या मध्ये २ एक्झिक्युटीव कंपार्टमेंट असतील. प्रत्येकात ५२ जागा असतील, तर सामान्य डब्यात ७८ जागा असतील अशी माहिती आयसीएफचे महाप्रबंधक सुधांशू मणी यांनी दिली आहे. शताब्दी ट्रेनचा वेग १३० किमी प्रती तास आहे. तर ही ट्रेन १६० किमी प्रती तासाच्या वेगानं धावेल. या ट्रेनमध्ये जीपीएस आधारित प्रवासी सूचना प्रणाली, वेगळ्या प्रकारचे लाईट, ऑटोमेटिक दरवाजे आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. शताब्दी ट्रेन १९८८ मध्ये सुरु करण्यात आली होती. सध्या ही ट्रेन देशातल्या मेट्रो शहरांना दुसऱ्या प्रमुख शहरांशी जोडणाऱ्या २० रेल्वे मार्गांवर सुरु आहे.

# नक्षलवाद्यांबरोबर चकमकीत सीआरपीएफचे पाच जवान शहीद



छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांची गाडी स्फोटामध्ये उडवून दिली. या हल्ल्यामध्ये सीआरपीएफचे पाच जवान शहीद झाले असून दोन जवान जखमी झाले आहेत. नक्षलवाद्यांनी सीआरपीएफची सुरुंगापासून संरक्षण देणारी गाडी उडवली. सीआरपीएफचे जवान गस्तीवर निघालेला असताना हा हल्ला झाला. सीआरपीएफने मुरदाना भागात कॅम्प लावला होता. तिथे शनिवारी संध्याकाळी चारच्या सुमारास ही घटना घडली. हा भाग अवापल्ली पोलीस स्टेशनच्या हद्दीत येतो अशी माहिती पोलीस अधीक्षक मोहित गर्ग यांनी दिली.

# पुणेकरांवर आता पोलिसांच्या बॉडी कॅमेऱ्याची नजर



**पुणे :** वाहतूक पोलिसांशी तुम्ही अनेकदा वाद घातला असेल. परंतु या पुढे हा वाद घालनं तुम्हाला महागात पडू शकतं. कारण वाहतूक शाखेकडून आता वाहतूक पोलिसांना बॉडी कॅमेरे पुरुविण्यात आले असून या कॅमेराचा वापर करुन पोलिसांशी हुज्जत घालणाऱ्यांचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात येणार आहे. तसेच त्या व्यक्तीविरोधातल्या कायदेशीर कारवाईत तो व्हिडीओ पुरावा म्हणून वापरण्यात येणार आहे. त्यामुळे यापुढे वाहतूक पोलिसांशी वाद घालण्याआधी शंभरवेळा विचार करा.

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमित प्रयत्न करण्यात येत असतात. विशेष मोहिम राबवून वाहतूकीचे नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यात येते. अनेकदा वाहतुकीचे नियमन करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिस कारवाई करत असताना, काही वाहनचालक पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी वाद घालत असतात. पोलिसांना मारहाण करण्यापर्यंतही अनेकांची मजल जाते. अशा वाहनचालकांवर जरब बसविण्यासाठी वाहतूक शाखेकडून आता नामी शक्कल लढविण्यात येत आहे. वाहतूक शाखेकडून वाहतूक पोलिसांना बॉडी कॅमेरे पुरविण्यात आले आहेत.

शबरीमला मंदिर हिंसाचार

# केरळ पोलिसांकडून २०६१ जण ताब्यात ४५२ जणांवर गुन्हे दाखल

**केरळमधील प्रसिद्ध शबरीमला मंदिरात सर्व वयोगटातील महिलांना प्रवेश देण्याच्या सुप्रीम कोर्टाच्या आदेशाविरोधात आंदोलन करताना हिंसाचार घडवून आणल्याप्रकरणी केरळ पोलिसांनी २०१६ लोकांना ताब्यात घेतले आहे. तर ४५२ जणांवर गुन्हे दाखल केले आहेत. केरळचे पोलीस महासंचालक लोकनाथ बेहरा यांनी ही माहिती दिली.**

बेहरा म्हणाले, आम्ही सुमारे ४५० लोकांवर गुन्हे दाखल केले आहेत, तर सुमारे २००० लोकांना ताब्यात घेतले आहे. हिंसाचार केल्याप्रकरणी इतर अनेकांचीही ओळख पटली असून आणखी लोकांना ताब्यात घेण्यात येणार आहे. याबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.



सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करताना महिलांना मंदिरात प्रवेश देताना सुरक्षा पुरवण्यासाठी काय करता येईल, यासाठी पोलीस कमिटीकडून सूचना मागवण्यात येत आहेत. याबाबत अद्यापही चर्चा सुरु असून आम्ही कुठल्याही निर्णयाप्रत आलेलो नाही, असेही पोलीस महासंचालक बेहेरा यांनी सांगितले.

केरळमधील शबरीमला मंदिरात सर्व वयोगटातील महिलांना प्रवेशापासून रोखता येणार नाही असा आदेश नुकताच सुप्रीम कोर्टाने दिला होता. त्यानंतर या निर्णयाविरोधात शबरीमला मंदिर परिसरात अनेक हिंदू संघटनांकडून जोरदार विरोध करण्यात आला. आंदोलकांनी या मंदिरात महिलांना जाण्यापासून रोखले. प्रसंगी दगडफेक आणि जाळपोळही करण्यात आली होती. या घडामोडीत मंदिराचे दरवाजे ठराविक काळानंतर बंद झाल्याने महिलांना या मंदिरात प्रवेश करता आला नाही.

# फटाक्यांच्या ऑनलाइन विक्रीवर बंदी



**नवी दिल्ली:** फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी देशभरात फटाक्यांच्या विक्रीवर बंदी घालण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. फटाके विक्रीला सशर्त परवानगी देत असल्याचं सांगतानाच ऑनलाइन फटाके विक्री करण्यास मात्र सर्वोच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. न्यायालयाने ई-कॉमर्स पोर्टल्सला फटाके विकण्यास मज्जावही केला आहे. ऐन दिवाळीच्या तोंडावर कोर्टाने हा निर्णय दिला असून दिवाळीत रात्री ८ ते १० च्या दरम्यानच फाटके फोडण्याचे बंधनही घालण्यात आले आहे.

फटाक्यांच्या विक्रीबाबत सर्वोच्च न्यायालयाने आज महत्त्वपूर्ण निर्णय दिला. केवळ परवाना असलेले ट्रेडर्सच फटाके विकू शकतात, असं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. प्रदूषण रोखण्यासाठी फटाक्यांच्या विक्रीवर देशव्यापी बंदी घालण्याची याचिका न्यायाधीश ए. के. सिकरी आणि अशोक भूषण यांच्या खंडपीठासमोर आली होती. त्यावर आज हा निर्णय देण्यात आला आहे. फटाके विक्रेत्यांचा रोजगाराचा मूलभूत अधिकार आणि देशातील १.३ अब्ज लोकांच्या आरोग्याचा अधिकारासहीत विविध गोष्टींना ध्यानात घेऊनच त्यावर निर्णय देण्यात येणार असल्याचं या खंडपीठाने स्पष्ट केलं होतं. संविधानाच्या अनुच्छेद-२१ सर्व वर्गांना लागू होतो. मात्र फटाक्यांवर देशव्यापी बंदी घालताना त्यात काळाचं संतुलन ठेवणं गरजेचं आहे, असं कोर्टानं स्पष्ट केलं. कोर्टाने कमी प्रदूषण करणारे ग्रीन फटाके विकण्यास परवानगी दिली आहे.

# धक्कादायक! : भेसळयुक्त रक्त विकणारी टोळी जेरबंद; हजाराहून अधिक रुग्णांना विकले रक्त

**लखनऊ :भेसळयुक्त रक्त तयार करुन ते रुग्णांना विकणाऱ्या टोळीला उत्तर प्रदेश पोलिसांनी जेरबंद केलं आहे. या टोळीने आजवर एक हजाराहून अधिक रुग्णांना हे बनावट रक्त विकल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. एसटीएफच्या पथकाने हा कारवाई करीत पाच जणांना ताब्यात घेतले आहे.**

पोलिसांच्या माहितीनुसार, पैसा कमावण्यासाठी रुग्णांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या या टोळीसोबत लखनऊ शहरातील अनेक मोठ्या रक्त पेढ्यांचा आणि प्रयोगशाळेतील कर्मचाऱ्यांचाही सहभाग उघड झाला आहे. महत्वपूर्ण पुरावे मिळाल्यानंतर एसटीएफ आणि एफएसडीएने रक्त पेढ्यांविरोधात तपासणी मोहिम हाती घेतली आहे.

एसटीएफचे वरिष्ठ अधिकारी अभिषेक कुमार सिंह यांनी सांगितले की, दोन महिन्यांपूर्वी पोलिसांना शहरात भेसळयुक्त रक्त तयार केले जात असल्याची माहिती मिळाली होती. यानंतर रक्त विकणाऱ्या अनेक लोकांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी करण्यात आली होती. दरम्यान, ही माहिती उघड झाली की लखनऊमधील त्रिवेणीनगर येथील एका घरात हे भेसळयुक्त रक्त बनवण्याचा गोरखधंदा सुरु आहे. त्यामुळे गुरुवारी रात्री पोलिसांनी या टोळीचा सुत्रधार मोहम्मद नसीम याच्यासह राघवेंद्र सिंह, रशीद अली, पंकज कुमार त्रिपाठी यांना ताब्यात घेतले.



यांतील राघवेंद्र सिंह हा एका रक्त पेढीमध्ये लॅब टेक्निशिअन आहे. तर पंकज त्रिपाठी लॅब असिस्टंट असल्याचे समोर आले आहे. हे दोघेही नसीमच्या घरी जाऊन रक्तदात्यांकडून रक्त गोळा करायचे. यासाठी रशिद अली पैशांचे आमिष दाखवत रिक्षा चालक आणि नशा करणाऱ्यांना स्वतःचे रक्त विकण्यासाठी घेऊन यायचा. यामध्ये भेसळयुक्त रक्तासाठी सर्टिफाइड रॅपर, बॅगा आणि इतर कागदाची सोय करण्याची जबाबदारी हनी निगम याच्यावर होती.

ही टोळी एक युनिट रक्ताच्या नमुन्यामध्ये सलाईन वॉटर मिसळून दोन युनिट रक्त तयार करीत होती. या रक्ताला पॅक्ड रेड ब्लड सेल्स (पीआरबीसी) म्हणून विकले जात होते. यासाठी सर्टिफाइड रक्त पेढ्यांचे रॅपर आणि बॅगांचा वापर करण्यात येत होता. हे लोक एक युनिट रक्ताच्या बदल्यात रक्तदात्यांना ५०० ते १००० रुपये देत होते. त्यानंतर या रक्तात भेसळ करुन ते २ हजार ते ४ हजार रुपयांना विकले जात होते. हे भेसळयुक्त रक्त रुग्णाला चढवल्यास काही वेळात त्याला हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू होऊ शकतो. इतकेच नव्हे रक्तदात्यांकडून घेतलेल्या रक्ताची चाचणी केलेली नसल्याने एचआयव्ही, हेपॅटायटिस सारखे गंभीर आजार होऊ शकतात, तपासातून समोर आले आहे.

# पोलिसांची चिकाटी! पत्नीची हत्या करुन फरार आरोपीला १५ वर्षांनी अटक

अहमदाबादमध्ये व्हॅलेंटाईन डेला पत्नीची हत्या करुन फरार झालेल्या ४२ वर्षीय आरोपी पतीला पोलिसांनी तब्बल १५ वर्षांनी अटक केली आहे. तरुण जिनराज असं आरोपी पतीचं नाव आहे. गळा दाबून त्याने पत्नीची हत्या केली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने हत्येनंतर पळ काढला होता. त्याने आपली ओळख बदलत पुन्हा लग्न केलं होतं. गेल्या सहा वर्षांपासून तो बंगळुरुत आपली पत्नी आणि दोन मुलांसोबत राहत होता.



अहमदाबाद गुन्हे शाखेने या हत्येचा छडा लावला असून आरोपी तरुणला अहमदाबादहून बंगळुरुला आणण्यात आलं आहे. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ फेब्रुवारी २००३ रोजी आरोपी तरुणने पत्नी सजनीची गळा दाबून हत्या केली. त्यांच्या लग्नाला फक्त तीनच महिने पूर्ण झाले होते. त्याने चोरांनी हत्या केल्याचा बनाव करण्याचा प्रयत्न केला. लग्नाआधी असणाऱ्या आपल्या प्रेसयीसोबत लग्न करण्यासाठी त्याने ही हत्या केली होती. तरुण त्यावेळी एका शाळेत बास्केटबॉल प्रशिक्षक म्हणून काम करत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जेव्हा आरोपी तरुणला संशय आपल्याकडे वळत असल्याचं लक्षात आलं तेव्हाच त्याने पत्नी सजनीच्या खात्यातून ११ हजार रुपये काढून घेत पळ काढला. पोलिसांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र पत्ता लागला नाही. पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांकडेही चौकशी करत माग काढण्याचा प्रयत्न केला होता.

गुन्हे शाखेचे अधिकारी काही दिवसांपूर्वी तरुणची आई अन्नामा यांच्या मध्य प्रदेशातील घरी गेले होते. यावेळी त्यांनी शेजाऱ्यांकडे चौकशी केली केली. 'शेजाऱ्यांनी त्यांना दोन मुलं असून एक दक्षिणेत आणि दुसरा अहमदाबादमध्ये राहत असल्याचं सांगितलं. यावेळी आम्हाला त्या वारंवार केरळ आणि बंगळुरुला जात असल्याचं कळलं. तपास केला असता केरळमध्ये त्या धार्मिक ठिकाणी दर्शनासाठी जात होत्या असं समजलं', अशी माहिती अधिकाऱ्याने दिली.

अन्नामाला बंगळुरुमधील एका लँडलाइन नंबरवरुन फोन येत असल्याचं पोलिसांच्या निदर्शनास आलं. हा नंबर ओरॅकलवर रजिस्टर होता. तर मोबाइल क्रमांक आरोपी तरुणची सध्याची पत्नी निशाच्या नावे रजिस्टर होता.

# दाती महाराजविरोधात लैंगिक अत्याचाराचा गुन्हा, CBI कडून तपास सुरू



**स्वयंघोषित अध्यात्मिक गुरू दाती महाराजविरोधात दिल्ली हायकोर्टाच्या आदेशानंतर केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने गुन्हा दाखल करत तपासाला सुरुवात केली. पीडित तरुणीवर अनैसर्गिक अत्याचार आणि बलात्कार केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

स्वयंघोषित अध्यात्मिक गुरू दाती महाराजवर जून महिन्यात एका शिष्येने बलात्काराचा आरोप केला होता. दिल्लीतील फतेहपूर बेरीमधील शनिधाम मंदिरालगत दाती महाराजचा आश्रम आहे, पीडित तरुणी २५ वर्षांची असून ती गेल्या १० वर्षांपासून आश्रमात त्यांची अनुयायी होती. मात्र दाती महाराजने आश्रमात आपल्यावर बलात्कार केला आणि याची वाच्यता केल्यास ठार मारण्याची धमकी दिली असे पीडित तरुणीने म्हटले होते. पीडित तरुणी मूळची राजस्थानची आहे.

२२ जून रोजी दिल्ली पोलिसांनी या प्रकरणी दाती महाराजची चौकशी देखील केली होती. यानंतर दाती महाराजविरोधात लूक आऊट नोटीस जारी करण्यात आली होती. मात्र, दिल्ली पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत पीडितेने थेट हायकोर्टात याचिका दाखल केली. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्याची विनंती तिने हायकोर्टाला केली होती. हायकोर्टानेही तिची विनंती मंजूर करत या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे वर्ग करावा, असे आदेश दिले होते. हायकोर्टाच्या आदेशानंतर अखेर शुक्रवारी सीबीआयने दाती महाराजविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# ८५७ पॉर्न वेबसाइट बंद करण्याचे केंद्राचे आदेश



**नवी दिल्ली** – उत्तराखंड हायकोर्टाने अश्लिलता पसरवणाऱ्या वेबसाइट बंद करण्याचे निर्देश दिल्यानंतर खडबडून जागे झालेल्या केंद्र सरकारने इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना ८५७ पॉर्न वेबसाइट बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

माहिती सूचना मंत्रालयाने केलेल्या चौकशीत ८५७ वेबसाइटपैकी ३० वेबसाइटवर अश्लील व्हिडिओ, फोटो, मजकूर आढळला नसल्याने या साईट्सना यामधून वगळण्यात आले आहे. ८५७ पैकी ८२७ वेबसाइट बंद करण्याची यादी मंत्रालयाने जाहीर केली आहे. सर्व लायसन्स प्राप्त इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना हायकोर्टाच्या आदेशाचे पालन करणे गरजेचे आहे. हायकोर्ट आणि केंद्र सरकारच्या आदेशानंतर ८२७ पॉर्न वेबसाइट तात्काळ बंद करण्याच्या सूचना संबंधित कंपन्यांना दिल्या आहेत.

पॉर्न वेबसाइट बंद करण्याचे आदेश उत्तराखंड हायकोर्टाने २७ सप्टेंबर २०१८ रोजी दिले होते. याआधी केंद्र सरकारने चाइल्ड पॉर्नोग्राफीसंबंधीत ३ हजार ५०० हून अधिक वेबसाइट बंद केल्या आहेत.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)